*10th Pune International Film Festival 2012*

१७ जानेवारी २०१२

# जिजाऊंचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व लोकांपुढे आणण्यासाठीच चित्रपट- यशवंत भालकर

छत्रपती शिवरायांसारख्या महान पुत्रास घडविणाऱ्या राजमाता जिजाऊंचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व आजही आदर्श आहे. ते लोकांपुढे आणण्यासाठी त्यांच्या जीवनावर चित्रपट तयार करण्यात आल्याचे दिग्दर्शक यशवंत भालकर आणि निर्माते शरद निमसे यांनी सांगितले.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटाचे जोरदार स्वागत करण्यात आले. मे महिन्यात हा चित्रपट प्रदर्शित झाला. इंडनमधील महोत्सवात चित्रपटाने रसिकांना जिंकले. तर कर्नाटकात चित्रपट अनेक आठवडे चालला पण महाराष्ट्रात हा चित्रपट अजून लोकांपर्यंत पोहोचलेलाच नाही.

मदन पाटील यांनी राजमाता जिजाऊंवर लिहिलेल्या कादंबरीने भारावून आपण चित्रपट तयार करण्यास प्रवृत्त झालो. सुमारे चारशे वर्षांपूर्वीचा हा काळ होता. त्या काळात जिजाऊंच्या वडिलांनी आपल्याला मुलगी हवी हा विचार केला होता. आपल्या चिमुरड्या बालकास घेऊन जिजाऊ पुण्यास आल्या. इथली भूमी सोन्याच्या नांगराने नांगरुन रयतेच्या मनात विश्वास जागविला आणि पुणे शहर पुन्हा उभे केले. आजच्या काळातील स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवरील अत्याचार या विषयांना जिजाऊंनी त्या काळात वाचा फोडली. हे लोकांपुढे यावे ही भावना होती.

या चित्रपटास राज्यसरकारने आर्थिक मदत द्यावी यासाठी मुख्यमंत्र्यांकडे अर्ज केला आहे असे निमसे यांनी सांगितले.

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४ ५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY

Pune Film Foundation

JOINTLY WITH

Government of Maharashtra